# Department of Japanese Language



MEXT Scholarship - Monbusho Scholarship by Japan's Ministry of Education,

2025-26 Winners with Hon. Chancellor and Hon. Vice Chancellor and HOD of the Japanese Department.



## जपान सरकारच्या मोम्बुशो शिष्यवृत्तीसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ८ विद्यार्थ्यांची निवड

**पुणे :** जपान सरकारतर्फे दर वर्षी मोम्बुशो या प्रतिष्ठित शिष्यवृत्तीसाठी परीक्षा घेतली जाते. या वर्षी संपूर्ण भारतातून निवड झालेल्या ९ पैकी ८ विद्यार्थी हे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे आहेत. या शिष्यवृत्ती अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी जपानमध्ये राहून जपानी विद्यापीठात जपानी भाषा व संस्कृतीचे अध्ययन करण्याची संधी मिळते. टिमविच्या जपानी विभागातील बीएच्या द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना ही संधी मिळाली आहे.

पुण्यात जपानी भाषेचे शिक्षण देणाऱ्या संस्थांपैकी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ हे एक महत्त्वाचे विद्यापीठ आहे. येथे जपानी भाषेमध्ये पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम चालवले जातात. जपानी भाषेच्या शिक्षणासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुण्यासह संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणात टिमविच्या जपानी विभागातील विद्यार्थी मोम्बुशो या प्रतिष्ठित शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरतात.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. गीताली टिळक व प्रभारी कुलसचिव डॉ. सुवर्णा साठे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि कौतुक केले. यावेळी जपानी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मंजिरी भालेराव आणि समन्वयक स्वाती धर्माधिकारी उपस्थित होत्या.

या शिष्यवृत्तीसाठी निवडण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना जपानमधील विविध विद्यापीठात जपानी भाषेचे शिक्षण घेता येणार आहे. त्यात पारस सुजीत नाखरे या विद्यार्थ्याला वाकायमा विद्यापीठात शिक्षण घेता येणार आहे. आर्यन राज याला नागोया, आकांक्षा प्रदीप निकम हिला ओसाका, अलया संदिप अवधारे याला तोयामा, आदिती हरिश्चंद्र कुंभार हिला साइतामा, लिंथॉय डायमंडथोंगम होक्काइदो, आणि राशी राजेन्द्र तोतला यांना तोततोरी या विद्यापीठात जपानी भाषा व संस्कृतीचे अध्ययन करण्याची संधी मिळाली आहे.

**मोम्बुशो शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक, कुलगुरू डॉ. गीताली टिळक व प्रभारी कुलसचिव डॉ. सुवर्णा साठे, विभागप्रमुख डॉ. मंजिरी भालेराव समन्वयक स्वाती धर्माधिकारी यांनी अभिनंदन केले.**

## Bridging the Gender Gap: Insight from Showa Women's University, Tokyo_2025_2026



## Visits and interactions with students by companies:

Many companies visit Japanese department to understanding Japanese language education in the department and interact with the students.



**Visit by officials of Japan External Trade Organization JETRO**



**Visit by Japanese clients of TCS**



**Visit by Proceed Technologies**

**Asia University Global Program (AUGP)**

**Japanese students from Asia University studied Hindi Language short course at TMV,**

**February 2026**



# Cultural Exhibition


















Origami Ikebana Fusion